<u>प्रेसनोट</u> दिनांक २९/०६/२०१८

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवी आबादी भोकर येथील सहशिक्षक गणेश साहेबराव जाधव यांनी १,८००/—रु. लाच स्विकारल्यानंतर नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.**

यातील तक्रारदार यांनी दिनांक २५/०६/२०१८ रोजी कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाचलूपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली की, **" त्यांच्या पत्नीने जिल्हा परिषद शाळेत शालेय पोषण आहार योजने अंतर्गत खिचडी शिजवण्याचे केलेल्या कामाचे बिल ऑनलाईनला वेळोवेळी भरल्याबद्दल आणि भविष्यात वेळोवेळी बील ऑनलाईनला भरण्यासाठी शिक्षक जाधव हे १,८००/—रू. ची लाच मागणी करीत असल्याची तक्रार दिली".**

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २८/०६/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवीआबादी भोकर परिसरात पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये शिक्षक जाधव यांनी तक्रारदाराचे पत्नीने जिल्हा परिषद शाळेत शालेय पोषण आहार योजने अंतर्गत खिचडी शिजवण्याचे केलेल्या कामाचे बिल ऑनलाईनला वेळोवेळी भरल्याबद्दल आणि भविष्यात वेळोवेळी बील ऑनलाईनला भरण्यासाठी त्यांच्या पदाचा दुरूपयोग करून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेण्याचा उदेशाने तक्रारदार यांचेकडे १,८००/— रुपये लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक २९/०६/२०१८ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवीआबादी भोकर परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये आरोपी लोकसवक शिक्षक, गणेश साहेबराव जाधव, यांनी तक्रारदार यांचे पत्नीचे नमुद कामासाठी पंचा समक्ष १,८००/—रू. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन भोकर जि.नांदेड येथे आरोपी लोकसेवक गणेश साहेबराव जाधव, वय ४८ वर्ष, व्यवसाय नोकरी, सहशिक्षक नेमणुक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवीआबादी भोकर मुळ राहणार पवार कॉलनी भोकर यांचे विरुध्द कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमांक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमांक ०२४६२—२५३५१२

३) श्री संजय कुलकर्णी, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमांक ८५५४८५२९९९

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net

Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( संजय कुलकर्णी )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

कार्यालय पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि.नांदेड युनिट